# परिशिष्ट

# चारुता सागर यांची मुलाखत

♦ आपल्या लेखनाला सुरूवात कशी झाली ?

सैनिकी जीवनाचा त्याग केल्यानंतर जेव्हा लोणारवाडीच्या शाळेत शिक्षकी पेशा स्वीकारला. त्यावेळी दिवस विद्यार्थ्यांच्यासमवेत जायचा पण रात्री वेळ भरपूर शिल्लक असायचा. दिवसभर कष्ट केलेले लोक घोरू लागत. झोप येत नसे त्यावेळी वाचनाची सवय लागली. शेजारच्या रांजणी गावात ग्रंथालय होते. तेथून पुस्तके आणू लागलो. पोस्टमन 'स्वराज्य' चा अंक आणत असे. यातील कथा वाचून भटकंतीतील स्मृती जागृत झाल्या. आपल्या जवळ देखील समृद्ध अनुभव आहेत याची जाणीव झाली व मी लिहू लागलो.

♦ कथालेखन करताना कोणती विशेष काळजी घेतली ?

लेखन करताना विशिष्ट काळजी घेतली नाही, अनुभव पाठीशी होते त्यातूनच मी लिहित गेलो.

♦ आपण अमाप भटकंती केली त्यातून आपणास काय मिळाले ?

भटकंतीतून जीवनाचा अनुभव घेता आला. संपूर्ण भारत पायी हिंडून मुलूख पाहता आला. अनेक स्त्री पुरुषांच्या व्यथा जवळून पाहता आल्या. त्याचा भावी लेखनास फायदा झाला.

♦ लष्करी जीवनातील तुमचे अनुभव सांगा ? ते जीवन कसे वाटले ? त्याचा त्याग का केला ?

बेळगावला भरती झालो त्यावेळी पाकने आक्रमण केले होते. सुरूवातीचे ट्रेनिंग होताच श्रीनगर येथे पाठविले. तेथे सैनिकी जीवनाचा चांगला अनुभव आला. 'पूल', ' अंघोळ' 'हॉलिडे होम' सारख्या कथांची बीजे तेथेच आहेत. परंतु सैनिकी जीवन हे बंदिस्त जीवन होते. या बंदिस्त जीवनात राहणे हा माझा पिंड नव्हता. म्हणून मी त्याचा त्याग केला.

♦ तुमचे आवडते मराठी साहित्य कोणते ?

मला श्री.म.माटे, व्यंकटेश माडगुळकर, शंकरराव खरात, वि.स.खांडेकर यांचे साहित्य आवडते. यांच्या साहित्याचा प्रभाव माझ्यावर देखील झाला आहे.

♦ आपण भटकंती करणाऱ्या लोकांच्या जीवनावर विविध कथा लिहल्या. यामागील प्रेरणा कोणती ? भटक्या लोकांचे जीवन इतक्या बारकाव्याने कसे न्याहाळता आले ?

ग्रामीण मातीशी माझं नातं अखंड असल्याने ही भटकी लोक मला सतत दिसत होती. त्यांच्या जीवनाबद्दल माझ्या मनात कुतूहल होते. मी लोणारवाडीला शिक्षक असताना बऱ्याच लोकांचा मुक्काम शाळेजवळ असे. त्यामुळे या लोकांचे जीवन जवळून न्याहाळता आले. इतरांचे अनुकरण न करता वेगळेपण सिद्ध करण्याच्या हेतूने लिहित गेलो. यातूनच माझी कथा आकाराला आली.

♦ बऱ्याच कथांमध्ये सर्पाची वर्णने येतात. उदा. 'नागीण', 'सोबती', 'पूंगी', 'गर्भगंध' इ. या पाठीमागे तुमचा हेतू काय ?

हल्ली कमी होत जाणाऱ्या जंगलामुळे सापांनी लोकवस्तीचा आश्रय घेतला. यातूनच विविध घटना घडत गेल्या व तो एक माझ्या कथेचा विषय झाला.

♦ बऱ्याच कथांमध्ये सोशीक नायिका तर काही कथांमध्ये बंडखोर नायिका चित्रित करण्याचा हेतू काय ?

हिंदू धर्मातील स्त्री ही सोशीक आहे. ती बंड करत नाही. आपल्या पतीची, सासूची सेवा करण्यात ती आपलं जीवन समर्पित करते. परंतु काही स्त्रिया बंड करतात. पण समाजबंधनामुळे त्या व्यक्त करू शकत नाहीत. परंतु त्यांनी विरोध करावा असे माझे मत आहे.

♦ तुमच्या कथेचे विविध साहित्य प्रकारात वर्गवारी केलेली तुम्हास रूचेल काय ?

नाही. साहित्यात मतभेद नसावा. साहित्य हे साहित्यच असते. ज्याप्रकारे बापूचं व नागीणीच दु:ख सारखेच आहे. दु:खात फरक नाही. त्याप्रकारे साहित्यात फरक नसतो.

◆ आजच्या स्त्री स्वातंत्र्याबद्दल तुमचे मत काय ? ती स्वतंत्र आहे काय ?

आजची स्त्री सासू आहे तोपर्यंत स्वंतत्र नाही. परंतु पूर्वीच्या काळापेक्षा आज ती स्वतंत्र दिसू लागली आहे.

◆ पुरूषांपेक्षाही स्त्रियाच प्राण्यावर जास्त प्रेम का करतात ? उदा. 'दावं.'

पुरूषांपेक्षा स्त्रिया हळव्या मनाच्या असतात. यामुळे त्यांचे प्राण्यांवर अधिक प्रेम असते.

◆ स्त्री दु:खाचे चित्रण कथेमध्ये येण्याचे कारण काय ?

दुसऱ्या प्लेगच्या साथीमध्ये आईचे निधन झाले. घरात मन लागेना. त्यामुळे घराला राम राम ठोकला. जीवनात आईचे प्रेम कमी मिळाले. पोरकेपणा जाणवला. यातून स्त्री जीवनाचे आकर्षण मनामध्ये होते. या कारणास्तव स्त्री दु:खाचे चित्रण झाले असावे.

◆ देवदासी प्रथा बंद व्हावी असा कथेचा शेवट ' दर्शन ' कथेमध्ये होतो. हा विचार आपल्या मनात कसा आला ?

मी ज्या बनेवाडीच्या शाळेत शिक्षक होतो त्या शाळेशेजारी वयस्क स्त्री राहत होती. तिच्याकडे एक जोगतीण मंगळवार, शुक्रवार जोगवा मागण्यास येत असे. त्यावेळी ती आपल्या दु:खांची तिच्याकडे वाट मोकळी करी. हे तिच्या ह्रदयात न मावणार दु:ख ऐकून ही प्रथा बंद व्हावी व स्त्री जीवनातील हा वैताग संपावा. या उद्देशाने देवदासी प्रथा बंद व्हावी हा विचार मांडला.

◆ तुम्ही विविध जीवनानूभव घेतले. त्यातील कोणते जीवन तुम्हांला विशेष आवडले ?

शिक्षकी जीवन आवडले. लोणारवाडीतले जीवनानुभव आनंददायी ठरले.

◆ ' ढोलग ' कथेतील शेवंती पाय मोडलेल्या बाबल्याचा स्वीकार करते. असा शेवट तुम्हांला का करावासा वाटला ?

शेवंतीचे बाबल्यावर प्रेम होते.

◆ चारुता सागर या नावाबद्दल खरे रहस्य काय ?

दिनकर दत्तात्रय भोसले हे माझे नाव सहजासहजी उच्चारण्यास कठीण होतं. पूर्वकालीन अनेक लेखकाप्रमाणे आपलही टोपण नाव असावं ही मनोन इच्छा होती. बंगाली साहित्यवाचनाच्या प्रभावातून चारुता सागर हे नाव योग्य वाटले. चारुता म्हणजे सुंदर. या सुंदरतेचा सागर म्हणून मी चारुता सागर.

# संदर्भ ग्रंथसूची

१. हातकणंगलेकर म.द. : " मराठी कथा रूप आणि परिसर", सुपर्ण प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च १९८६.

२. पाटील विश्वास : "चारुता सागरांच्या कथालेखनाचे विशेष", शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला अप्रकाशित एम.फिल प्रबंध मे १९९२.

३. चारुता सागर : "नागीण" मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९१.

४. चारुता सागर : "मामाचा वाडा", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च १९८६.

५. चारुता सागर : " नदीपार ", रोही प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २ मे १९७६.

# वृत्तपत्रे व नियतकालिके

१. " बंद दरवाजा " दिवाळी अंक, ऑक्टोंबर,१९८६.

२. " दै. पुढारी " दिवाळी अंक २००५

३. " दै.लोकमत " संपादकीय, शनिवार १ डिसेंबर २००१,

" लोकमत विशेष ", रविवार २ डिसेंबर २००१.

४. " दै.लोकमत " हॅलो सांगली, दि.२६ सप्टेंबर २००५.